# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६०१२२३
०२०–२५६०१३५३
०२०–२५६०१२६३

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:– अंगुसिक/अभाउशिसका/ 51

दिनांक – १७/०१/२०१९

## अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संबंधित महाविद्यालये व परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७.

विषय – **अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१८–१९ ची माहिती भरणेबाबत.**

संदर्भ – १. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१८–१९/६१०, दि. १४ जानेवारी, २०१९ चे मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र.

२. मा. संचालक, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त ईमेल, दि. ०४/१२/२०१८.

महोदय/महोदया,

वरील संदर्भीय विषयानुसार संबंधित महाविद्यालये व परिसंस्थांना कळविण्यात येते की, **सन २०१८–१९ मध्ये ज्या महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१८–१९ मधील माहिती पूर्णपणे भरलेली नाही, अशा सर्व संबंधित महाविद्यालये व परिसंस्थांनी दि. ३१ जानेवारी, २०१९ पर्यंत किंवा त्याअगोदर संबंधित वेबपोर्टलवर माहिती अपलोड करणे बंधनकारक आहे. अन्यथा भविष्यात उद्भवणा–या नुकसानीस संबंधित महाविद्यालयाचे /परिसंस्थेचे मा. प्राचार्य/मा. सचांलक व नोडल अधिकारी जबाबदार राहतील याची संबंधित महाविद्यालयाने व परिसंस्थेने नोंद घ्यावी.**

तसेच **सन २०१८–१९ मध्ये ज्या महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१८–१९ मधील माहिती पूर्णपणे भरलेली नाही, अशा सर्व संबंधित महाविद्यालये व परिसंस्थांचे गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्य घेतलेल्या महाविद्यालयांची व परिसंस्थांचे हिशेब स्विकारले जाणार नाहीत याची संबंधित महाविद्यालये व परिसंस्थांच्या मा. प्राचार्य/मा. संचालक यांनी नोंद घ्यावी.**

**ज्या महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१८–१९ मधील माहिती पूर्णपणे भरलेली आहे, अशा सर्व महाविद्यालये व**

**परिसंस्थांनी विभागाचे संदर्भ पत्र क्र. अंगुसिक/अभाउशिसका/६४५, दि. २४ ऑक्टोबर, २०१८ नुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे, याची महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या मा. प्राचार्य/मा. संचालक व नोडल अधिका–यांनी नोंद घ्यावी.**

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी **दि. ३१ जानेवारी, २०१९** पर्यंत पूर्ण माहिती भरणे बंधनकारक आहे. यासंदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथील दूरध्वनी क्रमांक ०२०–२९७०७०९३ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, ०२०–२५६०१२२३, २५६०१३५३ यांच्याशी संपर्क साधावा.

आपला,

Rasve 17.1.19

(मुं. वि. रासवे)
उपकुलसचिव,
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)

प्रत मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग यांना देऊन प्राप्त आदेशानुसार विनंती करण्यात येते की, ज्या प्रशासकीय विभागामध्ये महाविद्यालयांशी व परिसंस्थांशी संबंधित कामे चालतात, अशा सर्व विभागांनी सन २०१८–१९ ची माहिती व्यवस्थापन प्रणाली (Management Information System) व अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (All India Survey Higher Education) ची माहिती संबंधित वेबपोर्टलवर भरल्यानंतर अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडून निर्गमित करण्यात येणारे ना–हरकत प्रमाणपत्र पाहूनच महाविद्यालयांची व परिसंस्थांची कामे करावीत. तसेच अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडून निर्गमित करण्यात येणारे ना–हरकत प्रमाणपत्र न पाहता महाविद्यालये/परिसंस्थांची कामे केली असे निदर्शनास आले तर होणा–या नुकसानीस संबंधित विभागाचे विभागप्रमुख जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.